3.2 Number of books and chapters in edited volumes/books published and papers published in national/ international conference proceedings per teacher during last five years (10)

| Sr. No. | Name of the teacher | Title of the book/chapters published | Title of the paper | Title of the proceedings of the conference | National / International | Year of publication | ISBN/ISSN number of the proceeding | Whether at the time of publication Affiliating Institution Was same Yes/NO | Name of the publisher |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 2018-19 | | | | | |
| 1 | Dr. Baliram P. Awachar | Mahatma Phulenche Shikshan Vishayak Vichar | | Mahatma Phule Chintan aani Charcha | | 18 Feb. 2019 | ISBN 978-93-81948-76-7 | Moreshwar Mahavidyalaya, Bhkardan Dist. Jalna | Chinmay Publication, Aurangabad |
| 2 | Prof. Manohar Wagatkar | Mahatma Phule's thoughts and works on women's education | | Mahatma Phule Chintan aani Charcha | | 18 Feb. 2019 | ISBN 978-93-81948-76-7 | Moreshwar Mahavidyalaya, Bhkardan Dist. Jalna | Chinmay Publication, Aurangabad |

Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225, Khadki, AKOLA

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA


Scanned with OKEN Scanner

# महात्मा फुले
# चिंतन आणि चर्चा

• संपादक •

डॉ.भगवान डोंगरे

डॉ.गोवर्धन मुळक



Smt. P.D. Patil Social Work College
College Code
225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

# महात्मा फुले : चिंतन आणि चर्चा

: संपादक :

डॉ. भगवान डोंगरे    डॉ. गोवर्धन मुळक

प्रकाशक
चिन्मय प्रकाशन,
सवणेकर बिल्डिंग, जिजामाता कॉलनी,
पैठणगेट, औरंगाबाद. मो. ९८२२८७५२१९
Email : chinmayprakashan@gmail.com

अक्षरगुंफण
ज्ञानेश्वर के. सुस्ते
वेदिका टाईपसेटर्स, औरंगाबाद

© लेखकाधीन

१८ फेब्रुवारी २०१९
वार - सोमवार
मुद्रक
ओंकार प्रिंटर्स,
औरंगाबाद.
मुखपृष्ठ
अपूर्वा ग्राफिक्स
औरंगाबाद.
₹ ४५०/-

ISBN - 978 - 93 - 81948 - 76 - 7

नोट : या पुस्तकातील सर्व शोधनिबंध लेखकाची मौखिक परवानगी ग्राह्य धरूनच एकत्रित करण्यात आलेले असून, त्यांनी शोधनिबंध जसे पाठविले होते तसेच मुद्रित शोधन न करता छापावे लागल्यामुळे त्यात मुद्रणदोष असू शकतात. शोधनिबंधातील मते ही प्रत्येकाची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक, सहसंपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

Smt. P.D. Patil Social Work College
College Code
225
Kladki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


१. महात्मा जोतीबा फुले यांच्या दृष्टिकोनातून शैक्षणिक विचार : एक अभ्यास
प्रा. एस.एन. मेढे ०१

२. महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य
प्रा. डॉ. विलास भगवानराव भिल्लार ०५

३. म. जोतीबा फुले यांचे शैक्षणिक कार्य
डॉ. विद्यासागर पुं. सोनकांबळे ०७

४. महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्यांचा अभ्यास
प्रा. पी. एस. निसाळ डॉ. डी. बी. खरात ११

५. महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य
प्रा. सुभाष आर नाईक (नवई) १५

६. महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार
प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे २०

७. महात्मा फुलेंचे शिक्षण विषयक विचार
प्रा. डॉ. बळीराम परसराम अवचार २३

८. महात्मा फुले यांचे अखंड : चिंतन आणि कार्य
डॉ. गोवर्धन काशीनाथ मुळक २६

९. महात्मा जोतीबा फुले यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य
प्रा. शरद शंकर गायकवाड ३२

१०. महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य
प्रा. डॉ. संजय गव्हाणे ३४

११. महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य
प्रा. पोकळे एस.एम. ३७

१२. शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत : क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले
दिलीप दामू कुमर ४१

१३. महात्मा जोतीराव फुले यांच्या शिक्षणविषयक कार्याचे विश्लेषणात्मक अध्ययन
प्रा. अमरिष एस. मावंडे ४४

१४. महात्मा जोतीबा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्याचे समन्वयात्मक अध्ययन ४८
दीपक वसंतराव ढोक


Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

# महात्मा फुलेंचे शिक्षण विषयक विचार

**प्रा. डॉ. बळीराम परशराम अवचार,**
श्रीमती पंचफुलादेवी पाटील
समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला.

**प्रस्तावना :**

महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक भारतातील एक श्रेष्ठ, कृतीशिल विचारवंत व समाजचिंतक होते. त्यांच्या कार्याची आणि विचारांची झेपही तितकीच मोठी आहे. एकोणिसाव्या शतकातील अनेक विचारवंत समाज सुधारकांचा विचार केला तर महात्मा फुले यांची एक वेगळीच विचार करण्याची दिशा आपल्या समोर येते. त्यांचे कार्य करण्याची शैली इतरांपेक्षा वेगळी असल्याचे दिसून येते. विद्या हेच बळ, ज्ञान हीच शक्ती ह्या जोतीरावांच्या विचारांतून त्यांची शिक्षणाविषयी असलेली विचारशक्ती खूप मोठी होती आणि शिक्षणाविषयीचे महत्त्व त्यांच्या जीवनात काय होते हे लक्षात येते. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे त्याचप्रमाणे ती काळ, परिस्थितीसापेक्ष सुध्दा आहे. समाजाच्या जडणघडणीत शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. शिक्षण हे अनेकविध माध्यमातून प्राप्त केल्या जात असून त्यामध्ये समाजसुधारकांनी नैसर्गिक शिक्षण, अनुभव प्रामाण्य शिक्षण, औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण इत्यादींना महत्त्वाचे मानलेले आहे. शिक्षण हे प्रबोधनाचे महत्त्वाचे साधन असून समाजसुधारकांनी त्यांचा प्रभावीपणे अवलंब केलेला आहे. समाजामध्ये पुरोगामी विचार रुजावे व समाज परिवर्तन घडावे म्हणून ज्या अनेक समाजसुधारकांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली त्या सर्वांच्या अग्रस्थानी म. फुल्यांचा गौरवपूर्ण उल्लेख लागेल.

समाजात पसरलेली अज्ञान-अंधश्रध्दा, दैववाद, दैन्यवाद आपल्या नाशास कसे कारणीभूत ठरले हे त्यांनी समाजाला पटवून दिले. शिक्षणाशिवाय समाज सर्वांगीण प्रगतीच्या मार्गावरून वाटचाल करू शकणार नाही. याची त्यांना खात्री पटली होती. म. फुले यांनी तृतीय रत्न या नाटकातून शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे हा संदेश दिला होता. शिक्षणाशिवाय माणूस क्रियाशील, कृतीप्रवण होऊ शकणार नाही हे त्यांनी जाणले होते. सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी जीवाचे रान केले. चार्वाक, बुध्द, कबीर यांच्या पुरोगामी, बुध्दीप्रामाण्यवादी विचारांचा स्विकार त्यांनी केला व प्रतिगामी विचारांशी वैचारिक संघर्षास ते सिध्द झाले. शिक्षणाची महती जाणणार शेतकऱ्यांचा असूड या पुस्तकात त्यांनी ज्ञानाची महती खालीलप्रमाणे विशद केली आहे.

विद्येविना मती गेली
मतिविना नीती गेली
नीतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले
एवढे अनर्थ एका अविद्येने केले.
(शेतकऱ्यांचा असुड महात्मा फुले, पृ. २५३)

समाजाला स्वतःचे अस्तित्व प्राप्त करून देण्यासाठी ज्ञानाची महती म. फुलेंनी विशद केली. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पावलोपावली पटवून देण्याचे कार्य म. फुले यांनी केल्याचे दिसून येते. वेगवेगळ्या जाती धर्मातील लोकांसाठी ठिकठिकाणी त्यांनी शाळांची निर्मिती केली. मुलींना १२ वर्षांपर्यंत सक्तीचे प्राथमिक शिक्षण द्यावे. हा पुणे महानगरपालिकेत झालेल्या फेब्रुवारी १९२०



College Code 225

त्या सभेपुढे हा ठराव मांडला होता परंतु त्यांच्या या प्रयत्नांना प्रस्थापितांकडून प्रचंड विरोध झाला होता. परंतु बुध्दीकौशल्य वापरुन त्यांनी आपले प्रयत्न सुरू च ठेवले होते. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची मागणी करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होत

शिक्षणाशिवाय व्यक्तीचे जीवन परावलंबी व अस्तित्वहीन असते. स्वावलंबी व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी शिक्षणाची कास धरावी अशी म. फुले यांची तिव्र इच्छा होती. परंतु ही गोष्ट त्यावेळी इतकी सहज शक्य होणारी नव्हती. कारण त्यावेळी भारतावर इंग्रजांचे वर्चस्व होते. इंग्रज अधिकारी असलेल्या मेकॉलेनी यांच्या मते भारतीय समाज हा उतरंडी सारखा आहे वरच्या थरातील लोकांच्या शिकवणी परंपरेने उत्तम गुणांचा परिपोष झालेला असतो. त्यांना ज्ञानाची पुरेशी आवड आणि पुरेशी फुरसत असते म्हणून शासनाने फक्त वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारावी कनिष्ठ वर्गाचे शिक्षण वरिष्ठ वर्गीयांवर सोपवावे असा विचार आपल्या (फिल्टरेशन थिअरी) म्हणजे झिरपण्याच्या सिध्दांतात मांडला. यामुळे समाजासाठी होणाऱ्या शिक्षणावरील खर्चात इंग्रज अधिकाऱ्यांना बचत करता येणार होती. त्यामुळे इंग्रजांना खर्च कमी येत होता म्हणून खुश होते तर दुसरीकडे उच्चवर्णियांचाही फायदा मोठ्या प्रमाणात झाला होता कारण शिक्षणाची सुत्रे त्यांच्या हाती देण्यात आल्यामुळे बहुजनांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यांच्या भोळ्या भाबड्या स्वभावाचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करुन घेणे शक्य होईल असे त्यांना वाटू लागले. परंतु म. फुले यांच्या हे लक्षात आले व त्यांनी पुढचा धोका टळावा यासाठी त्यांनी सरकारच्या या निर्णयाविरोधात हंटर कमिशनपुढे आपले निवेदन (१९ आक्टोंबर १८८२) सादर केले व इंग्रजांविरोधात आवाज उठविणारी पहिली व्यक्ती म्हणजे म. जोतीराव फुले हीच होय.

**म. फुले यांचा विचार तशी वाट :**

म. फुले कृतीशील विचारवंत होत. ज्या पध्दतीने बोलत होते त्याच पध्दतीने कृती करत होते. समाजातील लोकांनी आपल्या विचारावर ठाम राहावे असे त्यांना वाटत असे. यासाठी शिक्षणाची आवश्यकता असून आपले विचार ठामपणे मांडण्यासाठी शिक्षणाची जोड हवी असते. असे म. फुले यांचे मत होते.

**विद्या धन सर्व धन प्रधानमं :**

विद्या या धनावर कोणताही राजा कर लावू शकत नाही. विद्या हे धन चोरीला जावू शकत नाही. विद्या या धनात कोणी वाटेकरी होवू शकत नाही. विद्या ही सर्वांच्या ज्ञानात भर पाडते या सगळयांच्या आयुष्याला फुलविण्याचे कार्य करते. शिक्षणाचे महत्व जनसामान्यांना पटवून देण्याचे कार्य म. फुले यांनी केले.

**शूद्रासंदर्भात शिक्षण विषयक विचार :**

हजारो वर्षापासून भारतीय संस्कृतीने पददलितांना, अस्पृश्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. परंतु महात्मा फुले यांनी आपल्या अथक परिश्रमाने आपल्या विचारांना कृतीची जोड देत त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. इतकेच नव्हे तर त्यांनी आदिवासी भटक्या जाती जमातीच्या लोकाच्या मुलांना सुध्दा शिक्षण घेता यावे यासाठी प्रयत्न केले.

**शेतकऱ्याबाबत शिक्षण विषयक विचार :**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. बहुतांश लोक हे खेड्यात राहतात. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. शेतकऱ्याचा मुलगा शिकला तर हाच शिकलेला शेतकरी भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा होईल असे महात्मा फुले मानत असत. म. फुले यांनी आपल्या गुलामगिरी या पुस्तकातून असे मांडले आहे की, सावकार, भटजी, शेटजी यांच्याकडून शेतकऱ्यांचे फसवणूक होऊ दयावयाची नसेल तर शेतकऱ्यांची मुले शिकली पाहिजे. म. फुले च्या विचारामुळे शेतकरी आपल्या मुलांना शाळेत पाठवू लागला.

**स्त्री शिक्षणाची चळवळ :**

भारतीय संस्कृतीने मुलींना शिक्षण घेण्यापासून वंचित ठेवले होते. कारण चुल आणि मुल एवढेच स्त्रीचे कार्य असल्याचे मानले जात असे. परंतु आधुनिक काळात सर्वांच्या अगोदर मुलींची पहिली शाळा [illegible] स्त्रीला शिक्षण घेण्याचा पूर्ण

College Code 225



Scanned with OKEN Scanner

Moreshwar Shikshan Prasarak Mandal Rajur (G)'s

# MORESHWAR ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE, BHOKARDAN

Dist. Jalna (M.S.)

NAAC Reaccredited 'B' Grade

Mahatma Phule Pratisthan, Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad sponsored

## ONE DAY INTERDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE

18 February, 2019

# CERTIFICATE

This to certify that *Mr. [illegible]*

from *Shrimati P.D. Patil [illegible] College [illegible]*

has actively participated and presented a paper in the One Day National Conference on Mahatma Phule's Thoughts on Social Reform and its Relevance organised by the Department of Sociology, Moreshwar Arts, Science and Commerce College, Bhokardan. He presented a research paper entitled, [illegible]

Dr. [illegible]
Convener

Dr. Bhagwat [illegible]
Principal Organising Secretary

Scanned with OKEN Scanner

# महात्मा फुले
## चिंतन आणि चर्चा

• संपादक •

डॉ. भगवान डोंगरे
समाजशास्त्र विभागप्रमुख
मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन,
जि. जालना

डॉ. गोवर्धन मुळक
मराठी विभागप्रमुख
मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन,
जि. जालना

Smt. R.D. Patil Social Work College
College Code 225
Kaulkhed, AKOLA

चिन्मय
चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

Scanned with OKEN Scanner

# महात्मा फुले : चिंतन आणि चर्चा

: संपादक :

डॉ. भगवान डोंगरे डॉ. गोवर्धन मुळक

प्रकाशक
चिन्मय प्रकाशन,
सवणेकर बिल्डिंग, जिजामाता कॉलनी,
पैठणगेट, औरंगाबाद. मो. ९८२२८७५२१९
Email : chinmayprakashan@gmail.com

अक्षरगुंफण
ज्ञानेश्वर के. सुस्ते
वेदिका टाईपसेटर्स, औरंगाबाद

© लेखकाधीन

१८ फेब्रुवारी २०१९
वार - सोमवार
मुद्रक
ओंकार प्रिंटर्स,
औरंगाबाद.
मुखपृष्ठ
अपूर्वा ग्राफिक्स
औरंगाबाद.
₹ ४५०/-

ISBN - 978 - 93 - 81948 - 76 - 7

**नोट :** या पुस्तकातील सर्व शोधनिबंध लेखकाची मौखिक परवानगी ग्राह्य धरूनच एकत्रित करण्यात आलेले असून, त्यांनी शोधनिबंध जसे पाठविले होते तसेच मुद्रित शोधन न करता छापावे लागल्यामुळे त्यात मुद्रणदोष असू शकतात. शोधनिबंधातील मते ही प्रत्येकाची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक, सहसंपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

६३. महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा
श्रीमती स्वाती बोकार ... २१८

६४. महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार आणि कार्य
प्रा. मनोहर वागतकर ... २२१

६५. महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा
प्रा. बानायत जी.एच. ... २२६

६६. स्त्रियांचा उध्दारकर्ता : महात्मा जोतीराव फुले
डॉ. छाया मा. नेम्मानीवार ... २२८

६७. भारतीय स्त्री शिक्षणातील महात्मा जोतीराव फुले यांचे योगदान
भिमराव दत्तू मोट ... २३१

६८. महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार आणि कार्य
वैशाली अशोक जाधव ... २३३

६९. माहात्मा जोतीबा फुलेजी के महिला विषयक विचार
प्रा.डॉ. मदिना सिकंदर शेख ... २३७

७०. महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा
प्रा. डॉ. राणी जगन्नाथराव जाधव ... २३९

७१. महात्मा फुले यांचे शिक्षणाविषयक आणि कार्य
डॉ. लक्ष्मणसिंग साळोक - विलास पारखे. ... २४४

७२. महात्मा फुले यांच्या स्त्री विषयक विचार आणि कार्याचे समाजशास्त्रीय अध्ययन
प्रा.डॉ. तंगलवाड दत्ता माधवराव ... २४७

७३. सत्यशोधक समाज, निवडक सत्यशोधक व त्यांचे साहित्य
प्रा.के. एम. कांबळे ... २५२

७४. महात्मा फुलेंचे सामाजिक कार्यात योगदान
प्रा. रमेश नानजी गावित ... २५६

७५. महात्मा जोतीबा फुलेंच्या विचारांची प्रासंगिकता
प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ ... २६१

७६. महात्मा फुले यांचे समाज परिवर्तनविषयक कार्य
प्रा.डॉ. नरसिंग आबासाहेब पवार ... २६६

७७. महात्मा जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाची अधिवेशने
प्रा. डॉ. विजय पाटील ... २७०

७८. महात्मा फुले यांचे समाजोपयोगी कार्य
प्रा. पोपळघट आर. एस. ... २७२


Smt. A.D. Patil Social Work College ☆ Khadki, AKOLA ☆ College Code 225

Scanned with OKEN Scanner

७९. फुले, शाहू, आंबेडकरांची अनुसूचित प्रवर्गातील लोकांच्या राजकीय सामाजिककरणामधील भूमिका २७५
भीमराव लक्ष्मण शिरसाट

८०. महात्मा फुले : विचार, समाजसुधारणा व प्रासंगिकता २७८
मंजुषा स्वामी पारिपेल्ली-पर

८१. महात्मा फुले यांच्या कार्याचा : एक अभ्यास २८१
डॉ. महादेवी वैजनाथ फड , काबळे एस.टी..

८२. महात्मा जोतीबा फुलेचे शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक विचार २८५
प्रा. हंगरगेकर विठ्ठल निवृत्तीराव

८३. समाजक्रांतिकारक जोतीराव फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता २८८
प्रा.डॉ.जयराम श्री. सूर्यवंशी

८४. महात्मा फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता २९१
प्रा.कुकडे एस.जे. - प्रा. जुमडे जी.के.

८५. महात्मा जोतीबा फुले यांचा सामाजिक विचार एक अभ्यास २९७
प्रा.डॉ. उन्मेष मारोती शेकडे

८६. जोतीराव फुले के सामाजिक विचार और प्रासंगिकता ३०५
अंकुश कडुबा राऊत

८७. आद्य समाजसुधारक महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य ३०९
प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी

८८. महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा ३१३
प्रा. हिवराळे के.बी.

८९. महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा ३१६
प्रा.डॉ. काळे सुनिल राचप्पा

९०. महात्मा फुले : स्त्री प्रश्न आणि सुधारणा ३१९
प्रा.डॉ.सुषमा शंकरराव प्रधान - घेवंदे

९१. महात्मा फुले यांचे कृतीयुक्त शैक्षणिक विचार ३२४
प्रा.डॉ. विवेकराजे (विठ्ठल) घोलप

९२. स्त्री जीवनातील परिवर्तनात महात्मा फुलेंच्या विचारांचे योगदान ३२७
सहा. प्रा. पुरूषोत्तम बांडे

९३ महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य ३३०
योगेश रामकृष्ण वायाळ - रामेश्वर लिंबाजी दिवटे


Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

६४

# महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार आणि कार्य

प्रा. मनोहर वागतकर,
(सहा. प्राध्यापक)
श्रीमती पी. डी. पाटील, समाजकार्य महाविद्यालय, खडकी बु. अकोला

समता, बंधूभाव, स्वातंत्र्य आणि शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करणारे देशातील सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा जोतीबा फुले हे भारताचे खऱ्या अर्थाने क्रांतिज्योती ठरले. एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या या महापुरुषाने प्रज्वलित केलेल्या ज्ञानाच्या, समतेच्या ज्योतीने अज्ञानी समाजाला मानवतेचा मार्ग दाखविला. मानवतेला काळिमा फासणाऱ्या रुढिग्रस्त समाजाचा गाडा खोलवर रुतलेल्या, बरबटलेल्या, बंधुत्वाचा ध्वज खांद्यावर मिरवीत 'सत्यमेव जयते'चा घोष करीत खऱ्या माणुसकी-धर्माचे आपल्या आचार-विचारातून दर्शन घडविले.

क्रांति-ज्योती फुल्यांचे विचार कागदी फुलासारखे नव्हते. आपले विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवून दाखविले. आधुनिक भारतातील स्त्री-शिक्षणाचे जनक, दलित समाजाच्या मुलींसाठी शाळा काढणारे पहिले भारतीय, भारती स्त्रियांचे हक्क आणि स्वातंत्र्य याचे उद्गाते, शेतकरी व कामगार यांचे दारिद्र्य, दु:ख दूर करण्यासाठी चळवळी उभारणारे पहिले पुढारी, वर्णभेदावर तुटून पडणारे, मानवी समतेची घोषण करणारे पहिले लोकनेते, सामान्य जनतेच्या दैन्याला, दु:खाला वाचा फोडणारे पहिले महात्मा, सत्याची सतत पाठराखण करणारे सत्यशोधक, अशा अनेक अर्थांनी जोतीराव फुले हे कृतीने तळपणारे मानवरत्न होते. वीर सावकरांनी त्यांना 'समाज क्रांतिकारक' म्हटले, म. गांधींनी त्यांना खरा महात्मा असे संबोधून गौरविले; तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचा जयजयकार केला.

जोतीराव फुल्यांचे ऐतिहासिक कार्य भारतीय इतिहासाच्या पाना-पानांतून सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याइतकडे महान होते. आधुनिक महाराष्ट्राच्या जडण-घडणीचा भक्कम पाया म. फुल्यांनीच घातला. आजचा महाराष्ट्र हे भारतातील सर्व क्षेत्रांत पुढारलेले राज्य मानले जाते. अनेक थोर विभुतींनी महाराष्ट्राच्या देशाच्या प्रगतीला हातभार लावला. हे खरेच; परंतु ज्या काळात जोतीरावांनी बंड उभारुन समाजाला खरा मार्ग दाखविला, हे त्यांचे कार्य अपूर्वच होय. असे महापुरुष समाजाला नेहमीच लाभतात. असे नव्हे; पण त्यांनी केलेले कार्य, त्यांचे विचार हे समाजाला नेहमीच मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरत असतात.

**शैक्षणिक कार्याची सुरुवात :**

जोतीराव फुल्यांनी आपल्या शिक्षणकार्याची सुरुवात इ.स. १८४८ मध्ये शूद्रातिशूद्रांसाठी मुलींची पहिली शाळा पुणे शहरात स्थापन करून केली. हा काही योगायोग अथवा चमत्कार नव्हता. जगाच्या इतिहासात १८४८ हे वर्ष अनेक घटनांमुळे क्रांतिकारक ठरले आहे. शोषित, दलित मानवसमुहांच्या मुक्तीचा संघर्ष चेतविणाऱ्या कार्य मार्क्स यांचा 'कम्युनिस्टांचा जाहिरनामा' याच वर्षी प्रसिध्द झाला. अमेरिकेत स्त्री मुक्तीच्या चळवळीला न्यूयॉर्क शहरात याच वर्षी सुरुवात झाली. आपल्याकडे इतिहासाचा वारसा सांगणारी सातारा छत्रपतींची गादी याच वर्षी विसर्जित झाली. ऐतखाऊ, आळशी व चारित्र्यहीन ब्राम्हणांवर प्रहार करणारी आणि नवविचारांचा प्रसार करणारी लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची लेखमाला याच वर्षी प्रसिध्द झाली. महात्मा फुल्यांच्या चिंतनशील मनाने शिक्षणप्रसाराच्या कार्याला आरंभ करतांना तो कोठे कराव हे नेमके हेरले. ज्यांच्या जीवनात शेकडो वर्षांत अज्ञानाचा प्रचंड पाषाणवत पहाड निर्माण झाला होता; तो दलित, बहुजन समाज व स्त्रिया हेच राष्ट्रपरिवर्तनाचे मुख्य संख्याबळ



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

आहे याची अचूक जाणीव जोतीरावांना झाली. म्हणून अज्ञानाविरुध्दचा पहिला सुरुंग त्यांनी या क्षेत्रातच पेरला.

गुरुकुल शिक्षणपध्दतीच्या कालखंडात काही मोजक्या स्त्रिया वेदपारंगत होत्या. त्या गरुकुलात अध्यापनाचे कामही करीत होत्या. इतिहासात जनक आणि सुलभा, याज्ञवल्क आणि गार्गी, याज्ञवल्क आणि मैत्रेयी तसेच शंकराचार्य आणि विद्याधरी यांचे जाहीर वाद सुप्रसिध्द आहेत. स्त्रियांना जगातील इतर कोणत्या देशात भारतात मिळत होता. एवढा मानसन्मान मिळत नव्हता. त्यानंतरच स्त्रीला गुलाम बनविणारी व्यवस्था कशी जन्माला आली? पुढील काळात हिंदू धर्माचे कायदे बनविणाऱ्या मनूनेच तिच्या पायात या बेड्या ठोकल्या. तिचे स्वातंत्र्य व मानसन्मान हिरावून घेऊन तिला गुलाम बनविले. मनूने सांगितले, 'स्त्री पुरुषांना भ्रष्ट करते, म्हणून ज्ञानी मणसांनी स्त्रीपासून नेहमी सावध राहिले पाहिजे. आपली माता, भगिनी आणि कन्या यांच्या सहवासात कोणीही एकांतात राहू नये. कारण इंद्रिये प्रबळ असल्यामुळे ती विद्यासंपन्न पंडितालाही आपल्या जाळयात ओढतात. शय्येबद्दल ओढ, आराम व चैन यांचे आकर्षण, दागिने व अपवित्र वासनांची हाव, क्रोध, लबाडी, मत्सर आणि दुर्वर्तन हे सर्व दुर्गण स्त्रियांच्या ठिकाणी असतात. म्हणूनच स्त्रियांना वेद शिकण्याचा अधिकार नाही. स्त्रियांनी वेद उच्चारु नयेत.' मनूने जाहीर केलेल्या कायद्यांनी स्त्रियांची शिक्षणापासून पुढील काळात फारकात झाली. काही थोडे अपवाद वगळता इंग्रजांच्या आगमनापर्यंतच्या काळात स्त्रियांबद्दल हाच दृष्टिकोन येथे राहिला. रावबाजीच्या पेशवाईत स्त्रियांची स्थिती अशीच भयानक होती. आपली अब्रू वाचविण्यासाठी स्त्रियांना आत्महत्या करावी लागत होती. हा बदफैली पेशवा सर्वकाळ स्त्रियांच्या घोळक्यात वावरत असे.

जोतीरावांनी आपली पहिली शाळा सुरू करण्यापूर्वी महाराष्ट्रात इंग्रज सरकार शिक्षणासाठी करीत असलेले प्रयत्न अगदीच नगण्य स्वरुपाचे होते. इ.स. १८२१ साली सरकारने पुण्याला जे हिंदु कॉलेज उघडले, खरे म्हणजे ती संस्कृत पाठशाळा होती. अर्थात या पाठशाळेत ब्राम्हण समाजातील फक्त मूठभर विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत होता. विद्येचे माहेरघर म्हणून पुढे प्रसिध्दीस आलेल्या पुणे शहरातील या पहिल्या 'सरस्वतीमंदिराचे' दरवाजे जेथे बहुजन समाजाला खुले नव्हते तेथे स्त्री आणि दलित यांचा विचार करणे महापाप ठरले असते.

पुढे १८२० साली बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीने काही शाळा सुरू केल्या. शिक्षण प्रसारासाठी संस्थात्मक स्वरुपाचा आपल्या देशातील हा पहिला प्रयत्न होय. इ.स. १८२५ मध्ये सरकारने जिल्ह्यातील काही प्रमुख ठिकाणी शाळा सुरू केल्या. इ.स. १८३३ च्या सुमारास पुण्यामध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांनी २-३ शाळा सुरू केल्या. १८३३ मध्ये इंग्रज अधिकाऱ्यांच्या मदतीने पुण्यामध्ये एक मुलींची शाळा सुरू करण्याचा अयशस्वी प्रयत्न काही लोकांनी केला. परंतु त्या वेळच्या समाजात स्त्रीबद्दलची एकूण भूमिका, शिक्षणाबद्दलचे अपसमज, 'ब्राम्हणांनीच काय ती विद्या करावी' ही समाजात दृढ झालेली समजूत यामुळे ही पहिली शाळा चालविणारी मंडळी एखादे कारस्थान करावे त्याप्रमाणे मुलींना लपूनछपून शिकवीत असत. अर्थात, सनातन्यांच्या रेट्यापुढे शाळा चालकांचा टिकाव लागला नाही व त्यांना ती शाळा थोड्याच दिवसात बंद करावी लागली. जोतीरावांची स्थिती अशी नव्हती. निधडेपणाने व विचारांती त्यांन पाऊल उचलले होते. अहमदनगरहून परत येताच त्यांनी आपली पहिली शाळा सुरू केली. त्यासाठी त्यांनी सावित्रीबाईंना शिकवून तयार केले. जोतीरावांच्या या पहिल्या शाळेत वाचन, अंकगणित व व्याकरण या विषयांच्या अभ्यासाची सोय केलेली होती. त्यांच्या या प्रयत्नांला श्री. सखाराम परांजपे, श्री. सदाशिवराव गोवंडे, श्री. सदाशिव हाटे या त्यांच्या मित्रांनी साथ दिली. मित्रांची व सावित्रीबाईंची साथ असली तरी जोतीबारांचा मार्ग साधा, सोपा व सरळ नव्हता. जोतीरावांसारखा एका ब्राम्हणेतराने शाळा काढण्याचे धाडस केले होते. त्यातही मुलींची शाळा व त्या मुलीही दलित समाजातील. एकापेक्षा एक भयंकर गोष्टी झाल्या होत्या. त्या काळच्या सनातन्यांच्या पुणे शहराने जोतीरावांचे हे वर्तन देव, धर्म आणि समाज यांच्याविरुध्द असल्याचा एकच गहजब केला. स्त्रीला शिक्षण देणे म्हणजे तिला वाईट मार्गाला लावणे, स्त्री ही दोषाची आणि अज्ञानाची खाण आहे. तिला शिकविणे म्हणजे वेड्याच्या हाती कोलीत देण्यासारखे आहे, असा सडक्या शब्दांचा मारा सनातन्यांकडून



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

होऊ लागला. जोतीरावांचे हे शैक्षणिक कार्य म्हणजे हिंदू धर्मावरील एक रानटी हल्ला आहे, असा समज पसरवला जाऊ लागला. जोतीरावांच्या नातलगांमार्फत 'तुमच्या कृत्याचे परिणाम तुम्हाला भोगावे लागतील' अशा धमक्या देण्यापर्यंत सनातन्यांची मजल गेली. एका द्रष्ट्या समाजसुधारकाने नेमक्या ठिकाणी सुरुंग पेटविला होता. त्यांनी सनातन्यांच्या या कोल्हेकुईला मुळीच भीक घातली नाही. उलट आपल्या कार्याची दिशा योग्य आहे याची खात्री पटल्यामुळे आपल्या कामाचा वेग वाढविण्यासाठी दुसरे एक अभूतपूर्व पाऊल उचलले. त्यांनी आपल्या शाळेत शेपटीवर पाय पडल्यावर नाग जसा फणा काढून उभा राहतो तशीच अवस्था सनातनी ब्राम्हण मंडळींची झाली. मनूने, तथाकथित धर्मव्यवस्थेने स्त्रीच्या पायात ठोकलेल्या बेड्या सावित्रीबाईंनी जोतीरावांच्या मदतीने ताडताड तोडल्या. साहजिकच धर्माची भाषा बोलणाऱ्या ढोंगी लोकांनी निंदा-नालस्ती, शिवीगाळ सुरू केली. पिसाळलेल्या या लोकांनी चिखल, घाण, दगड यांचा मारा सावित्रीबाईंवर सुरू केला, परंतु हा गदारोळ निष्फळ ठरला.

**स्त्रीशिक्षणाचे आद्य प्रवर्तक :**

महात्मा फुल्यांच्या शैक्षणिक कार्याची ओळख करुन घेत असतांना त्यांच्या स्त्री शिक्षणाबद्दलची भूमिका आपण पाहिली आहेच. स्त्री शिक्षण म्हणजे कुटुंबाचे व पर्यायाने राष्ट्राचे शिक्षण होय. शिवाजीराजाला घडविणारी जिजाबाई ज्या महाराष्ट्राने पाहिली; त्या महाराष्ट्रात परंपरेच्या वरवंट्याखाली कित्येक स्त्रियांच्या आयुष्याचा चुराडाही झाला. केवळ ही अवस्था महाराष्ट्राचीच नव्हती तर आपल्या पुरातन संस्कृतीचे गोडवे गाणाऱ्या उभ्या भारतवर्षाची होती. इंग्रजी शिक्षण म्हणजे वाघिणीचे दूध आहे असे शिक्षण घेणारा वर्ग जोतीरावांच्या काळात महाराष्ट्रात उदयाला येऊ लागला होता. पुढे या वर्गातून महाराष्ट्राच्या वदेशाच्या विविध क्षेत्रांत नावलौकिक संपादन करणारी अनेक मोठी माणसं झाली. परंतु या वर्गाने स्त्री-स्वातंत्र्याची खरी शक्ती ज्या शिक्षणात आहे अशा शिक्षणाचा जोतीरावांसारखा ध्यास घेतला होता असे दिसून येत नाही. जोतीरावांनी ज्या सामर्थ्याने आपल्या कार्यात सावित्रीबाईंना घडविले, उभे केले व आपली सहकारी बनविली तसा प्रयत्नही अन्य कोणाकडून झालेला दिसत नाही. इतर सुधारक पुढील काळात विधवाविवाह, बालविवाह योग्य की अयोग्य यांची खडाजंगी चर्चा करीत राहिले. या जाहीर वादविवादात स्त्रियांनी व समाजसुधारणेची बाजू घेणारे प्रत्यक्ष कृतीच्या वेळी उणे पडले असेही दिसू येते. केवळ त्या काळातच अश घटना घडत होत्या असे नव्हे तर परकीयांची सत्ता संपली, स्वातंत्र्याचा कालखंड सुरू झाला, वर्षामागून वर्षे उलटत आहेत, विज्ञानाचा प्रसार होता आहे. तरीही आज आपल्या देशात स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण ६५ टक्के पर्यंत टिकून राहिले आहे. केवळ या एका गोष्टीचा विचार केला तरी महाराष्ट्रात किती प्रतिकूल परिस्थितीत मूलगामी शिक्षणकार्याला जोतीराव फुल्यांनी प्रारंभ केला याचे स्मरणही नतमस्तक करणारे आहे.

**जोतीबांचे स्त्री-शिक्षणाचे कार्य :**

१८४९ साली फुल्यांनी त्यांच्या सामाजिक कार्याचे पहिले पाऊल म्हणून पुण्यात मुलींच्यासाठी एक शाळा सुरू केली. यानंतर त्यांनी एक समिती स्थापन करुन आणखी दोन शाळा उघडल्या. दलित मुलांसाठी एक शाळा सुरू केली. स्त्री शिक्षिका मिळत नसल्यामुळे त्यांची बायको सावित्रीबाई यांनीच शिक्षिका म्हणून काम सुरू केले. त्या सर्व त्रास, अपमान, शिव्या सहन करुन जोतीबांच्या बरोबर ठामपणे उभ्या राहिल्या. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपासूनच मुलींना शिक्षण देणे हे समाजाचे महत्वाचे ध्येय होते १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनाच्या शेवटी फुले म्हणतात, 'सरते शेवटी मला शिक्षण शिक्षण आयोगाला एक विनंती करावयाची आहे. ती ही आहे की, त्याने स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार आणखी मोठ्या प्रमाणावर होईल, अशा प्रकारच्या उपाययोजना संमती द्यावी.'

शूद्रातिशूद्रांना शिखण मिळावे, विज्ञान मिळावे तसेच स्त्रियांना शिक्षण व विज्ञान मिळावे हे जोतीबांच्या सामाजिक कार्याचे एक अत्यंत कळीचे अंग होते.

खरे म्हणजे शिक्षण हे १९ व्या शतकाच्या सामाजिक परिसरात एक महत्वाचे अंग बनू लागले होते. आधुनिक शिक्षण घ्यायचे, विज्ञान शिकायचे, आधुनिक भांडवली युगाचे तंत्रज्ञान हातात घ्याचे अशी प्रवृत्ती वाढू लागली होती. वैयक्तिक पातळीवर



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki ...
Scanned with OKEN Scanner

शिकलेल्या युवकांना नोकरी मिळू शकते तर 'राष्ट्रीय' दृष्टीने नवीन विज्ञान तंत्रज्ञानाच्या सहाय्याने देशाला ताकद मिळते असा विचार होण्याचा तो काळ होता. याचबरोबर 'स्त्री शिक्षण' हा समाजसुधारणेच्या चळवळीमधला एक महत्वाचा कार्यक्रम झाला. ब्राम्हो समाज, आर्य समाज यापासून ते महाराष्ट्रातील धोंडो केशव कर्वेपर्यंत समाजसुधारकांनी शाळा, शिक्षणसंस्था, कॉलेज सुरू करण्याचा कार्यक्रम घेतला होता.

समाजसुधारणेच्या या सर्व प्रवाहांमध्ये जोतीबांचे वेगळेपण काय होते हे समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. शूद्र-अतिशूद्र मुलींना शिक्षण देऊ पहाणारे जोतीबा फुले आणि मध्यमवर्गीय, उच्च जातीय, भद्रलोक या प्रकारच्या थरातील मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणारे सुधारक यांच्या शिक्षण देण्याविषयीच्या एकूण भूमिकेमध्ये फार मोठा फरक होता.

जुन्या सरंजामी जातीय समाजामध्ये स्त्रिया, शूद्र व अतिशूद्र यांना शिक्षणाचा हक्क नव्हता. अगदी प्राचीन काळात मातृवंशीय किंवा मातृकेंद्रीत समाजामध्ये स्त्रियांना महत्वाचे स्थान होते. मोहेंजोदारोसारख्या सिंधू संस्कृतीच्या शहरामध्ये स्त्रिया संस्कृतीप्रमुख होत्या, विदूषी होत्या असे उल्लेख आहेत. पण या बाबतचा नेमका इतिहास आज उपलब्ध नाही. नंतरच्या काळात गार्गी सारख्या विदूषी स्त्रियांची उदाहरणे आहेत पण पुढे प्रस्थापित झालेल्या ब्राम्हणी पुरुषप्रधान समाजाला मात्र स्त्रियांचे शिक्षण पटण्यासारखे नव्हते. जातीव्यवस्था सुरू झाल्यानंतर स्त्रियांना मोकळेपणाने शिकण्याचा अधिकार पूर्णपणे बंद झाला. संस्कृत नाटकांमध्ये फक्त 'ब्राम्हण पुरुष' व राजे संस्कृत भाषा बोलतात तर बाकी सर्व शूद्रतिशूद्र पुरुष आणि सर्व थरातल्या स्त्रिया प्राकृत (बोली भाषा) बोलतात. हे उदाहरण ब्राम्हण-ब्राम्हणेतरात आणि पुरुष-स्त्रियात असणारी शिक्षणाची विषमता दाखविणारेच आहे. स्त्रियांचे रोजचे काम म्हणजे 'चुल व मूल' व शूद्रातिशूद्रातील स्त्रियांचे याशिवाय असलेले शेतीचे किंवा जातीचे इतर काम. त्यांचे धार्मिक काम म्हणजे पतिव्रत्याचे पालन! यासाठी स्त्रियांना शिक्षण देण्याची गरज त्या समाजातल्या ब्राम्हण धुरियांना वाटत नव्हती.

ब्रिटिश राज्य स्थापन झाल्यावर नवीन 'इंग्रजी शिक्षण' सुरू झाले. या शिक्षणातून उच्च जातीतला नवशिक्षित थर पुढे येऊ लागला. या थरातले पुरुष शिक्षणाच्या संदर्भात नवा वि ार करु लागले. नवीन जीवन पध्दत सुरू करायला लागले. तर त्यांच्या जीवनामध्ये अंतर्विरोध निर्माण होऊ लागले. त्यांच्यामध्ये एक प्रकारचा असंतोष तयार होऊ लागला. रविंद्रनाथ टागोरांनी हा असंतोष व्यक्त केला आहे, आपण जर स्त्री-शिक्षणाचा प्रसार केला नाही तर नविशिक्षित भारतीय समाजामध्ये नवना-बायकोमधला सुसंवाद नामशेष होईल.

'विद्येविना मति गेली; मतीविना नीती गेली; नीतीविना गति केली! गतींविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.'

जोतीबांची ही प्रसिध्द म्हण आहे. अज्ञान हे गरिबी व शोषणाचे मूळ कारण आहे असा अर्थ यातून पुढे येतो. पण जोतीबा शेवटी या विचाराच्या पुढे गेले असेच दिसून येते. मुलींना, स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या धार्मिक फसवणुकीविषयी जागृत होणार, गरिबीला शह देण्यासाठी ताकदवान होणार व अन्याय - अत्याचारांविरोधी आवाज उठविणार असे त्यांना वाटत होते. पण शेवटी जेव्हा कुटुंबातल्या व समाजातल्या स्त्रियांच्या गुलामगिरीची तीव्रता त्यांच्या लक्षात आली तेव्हा स्त्रियांचे गुलामगिरीविरुध्द बंड, स्त्रियांचा मुक्ती लढा असा आपोआप होणार नाही, त्यासाठी खास कार्यक्रम घ्यावे लागणार हे त्यांच्या लक्षात आले. ही जाणीव जोतीबांना कशी आली ते पहाणे महत्वाचे आहे.

शिक्षक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर खऱ्या अर्थाने सावित्रीबाईंच्या जीवनकार्याची सुरू वात झाली. सन १८४८ हे एक महत्वपुर्ण वर्ष आहे. इंग्रज शासक लॉर्ड डलहौसीने भारतात, पोस्ट, रेल्वे, शिक्षण कार्याची या वर्षांत सुरू वात केली. ज्योतीराव फुलेंनी पण १ जानेवारी १८४८ ला पुण्यामध्ये बालिका विद्यालयाची स्थापना केली. ते विद्यालय कुठल्याही भारतीयाद्वारा स्थापीत पहिले बालिका विद्यालय होय. शाळा बुधवार पेठेतील भिडे वाड्यात भरत असते. सावित्रीबाई फुले या विद्यालयाच्या पहिल्या शिक्षिका बनल्या. नंतरच्या काळात त्यांनाच मुख्याध्यापक बनविण्यात आले. या शाळेला चालविण्याकरीता फुले पती-पत्नींना कठीण परिश्रम करावे लागले. जरी या शाळेमध्ये ब्राम्हण विद्यार्थ्यांची अधिक संख्या होती तरी ब्राम्हणांनी सर्व पुणे शहरात हल्लाकल्लोळ



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki

Scanned with OKEN Scanner

माजविला होता. त्यावेळेच्या परिस्थितीनुसार फुले पती-पत्नींचे प्रयत्न धर्मविरोधी आचरण होते. ज्यावेळेला सावित्रीबाई फुले शाळेकरिता जायला घरातून निघत असत. त्यावेळी लोक त्यांच्यावर शेण आणि दगडे फेकून मारत असत त्यावेळी सावित्रीबाई फुले त्या लोकांना म्हणत माझ्या बंधुनो तुम्ही लोकं माझ्यावर शेण अथवा दगड मारत नसून मला प्रोत्साहन देण्याकरिता फुलांचा वर्षाव करीत आहात तुमच्या या कृत्यामुळे मी निरंतर आपल्या बहिंणींची सेवा करत रहावी ही आठवण मला नेहमी येत असते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंची ही स्मृती ज्योतराव फुलेंचे आद्य चरित्र लेखक पंढरीनाथ सिताराम पाटील यांनी १९२७ साली फुले चरित्रात लिहून प्रसिध्द केले आहे. मुलींच्या शाळेला मिळत असलेली सफलता बघून फुले पती-पत्नींनी १५ मे १८४८ ला पुणे शहरातील अस्पृश्य वस्तीमध्ये अतिशूद्रांकरीता मुलांमुलींच्या शाळेची स्थापना केली. सुरू वातीला सगुणाबाई क्षिरसागर या याच शाळेत शिकविण्याचे कार्य करीत होत्या. नंतर सावित्रीबाईंनी पण या शाळेमध्ये शिकविणे सुरू केले. फारच कमी वेळात फुले पती-पत्नींनी पुणे आणि त्याच्या जवळच्या गावांमध्ये १८ शाळांची स्थापना केली.

**संदर्भ :**


१) युगप्रवर्तक महात्मा जोतीबा फुले, सु. बा. भोसले, अमोल प्रकाशन, पुणे

२) महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य, प्रा. तानाजी ठोंबरे, लोकवाङमय गृह, मुंबई.

३) जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार, डॉ. गेल ऑम्वेट, लोकवाङमय गृह, मुंबई.

४) राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले यांची भाषणे व सामाजिक क्रांतीचे आंदोलन, छत्रपती शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर रिसर्च ॲण्ड पब्लीकेशन सेंटर, धुळे


Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

❑◆❑



Scanned with OKEN Scanner